**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाह्य वळण रस्ता (Outer Ring Road) व त्यालगत ४ वाहतूक बेट (Truck & Bus Terminal) विकसित करण्याच्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून घ्यावयाच्या कर्जावरील मुद्दल रु.४८०० कोटी व संभाव्य व्याज रु.३१९९.१३ कोटी असे एकूण रु. ७९९९.१३ कोटीच्या कर्जास शासन हमी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : शाहमी-२०२५/नगर विकास/प्र.क्र.९२/अर्थबळ,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,**
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :-२०/०४/२०२६

<u>वाचा</u> - १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शाहमी-१०९९/प्रक्र.६८/शा.हमी, दि. ०५.११.१९९९,
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शाहमी -१००८/प्रक्र.१८/शा.हमी, दि.२८.०४.२००८,
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शाहमी -१०२४/प्र.क्र.५८/अर्थबळ, दि.३०.०९.२०२४,
४) शासन निर्णय क्रमांक : शाहमी-२०२५/नगर विकास/प्र.क्र.९२/अर्थबळ,दि.०९.१०.२०२५
५) मा. मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समिती बैठक निर्णय दि.११.०३.२०२६

**<u>प्रस्तावना:</u>**

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाह्य वळण रस्ता (Outer Ring Road) व त्यालगत ४ वाहतूक बेट (Truck & Bus Terminal) विकसित करण्याच्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून घ्यावयाच्या रु.४८०० कोटीच्या कर्जास शासन हमी देण्याच्या प्रस्तावास दि.०३.०९.२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी दिली असून, त्यानुषंगाने नगर विकास विभागाने केलेल्या विनंतीनुसार, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हुडको या वित्तीय संस्थेकडून रु.४८०० कोटी (रुपये चार हजार आठशे कोटी फक्त) इतक्या रकमेचे कर्ज उभारण्यास शासन हमी देण्याबाबत वाचा क्र.४ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. तथापि, आता मा. मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दि.११.०३.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन यापूर्वी या विभागाने निर्गमित केलेला संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णय याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

आता,मा.मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दि.११.०३.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार हुडको या वित्तीय संस्थेकडून नागपूर शहराभोवती बाह्यवळण रस्ता (Outer Ring Road) व या मार्गावर तुरागोंदी, ता. हिंगणा, शिरुळ, ता. हिंगणा, परसाड ता. कामठी व इटागाव, ता.पारशिवनी या चार ठिकाणी ट्रक व बस टर्मिनल नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसित करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी निर्गमित केलेल्या रु.४८०० कोटी रक्कमेच्या हमी ऐवजी सदरहू घेण्यात येणाऱ्या रु.४८०० कोटी इतक्या कर्जावरील मुद्दल रकमेसाठी ८.६० टक्के या त्रैमासिक व्याज दराने रु. ४८०० कोटी इतक्या रकमेवर एकूण ६० समान हप्त्यामध्ये येणारी संभाव्य व्याजाची रक्कम ही एकूण रु.३१९९.१३ कोटी इतकी राहणार आहे. त्यामुळे कर्जावरील मुद्दल रु.४८०० कोटी व व्याज रु.३१९९.१३ कोटी असे एकूण रु.७९९९.१३ कोटी (रु. सात हजार नऊशे नव्याण्णव कोटी तेरा लाख फक्त) इतक्या रकमेस शासन हमी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

मा. मा.मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीने दि.११.०३.२०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे -

१. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाह्य वळण रस्ता (Outer Ring Road) व त्यालगत ४ वाहतूक बेट (Truck & Bus Terminal) विकसित करण्याच्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून घ्यावयाच्या कर्जावरील मुद्दल रु.४८०० कोटी व व्याज रु.३१९९.१३ कोटी असे एकूण रु.७९९९.१३ कोटी (रु. सात हजार नऊशे नव्याण्णव कोटी तेरा लाख फक्त) इतक्या रकमेस शासन हमी मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर शासन हमीवर कर्ज उचलण्याची मुदत शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांच्या कालावधीपर्यंत वैध राहील.

३. धनको बँक/ वित्तीय संस्थेसमवेत शासन हमीवर घेण्यात येणाऱ्या/आलेल्या कर्जासंबंधी करण्यात येणाऱ्या करारपत्रात खालील अटी व शर्तीचा समावेश करण्यात यावा.

३.१) शासन हमी एकूण रु. ७९९९.१३ कोटी इतक्या रकमेपुरतीच सिमीत राहील.

३.२) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे Principal Debtor राहील. हुडको या वित्तीय संस्थेकडून शासन हमी MUIF (Maharashtra Urban Infrastructure Fund) योजनेच्या नमुन्यामध्ये व कर्जाचा करारनामा हुडकोच्या नमुन्यामध्ये करण्यात यावा.

३.३) धनको संस्था ही राज्य शासनाच्या पूर्व अनुमतीशिवाय नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आदेशामध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक कर्ज देणार नाही.

३.४) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्जाच्या परतफेडीबाबत अथवा व्याजाची रक्कम देण्याबाबत होणाऱ्या कसूरीची सूचना शासनास ९० दिवसाच्या आत देणे संबंधित वित्तीय संस्थेस बंधनकारक असेल.

३.५) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अपरिहार्य कारणास्तव कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यास, राज्य शासन नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन राज्य शासनाकडून सदर कर्जाची परतफेड करण्यात येईल.

३.६) उपरोक्त परिच्छेद ३ मधील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास शासन हमी अवैध होईल.

४. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला रु.७९९९.१३ कोटी शासन हमी संदर्भात अ.क्र.१ तसेच अ.क्र.३ येथील अनुक्रमे दि.०५.११.१९९९ व दि.३०.०९.२०२४ मधील शासन निर्णयानुसार हमी शुल्क लागू राहील. तसेच खालील अटी व शर्ती लागू राहतील:-

४.१) सदर धनकोकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाचा वापर ज्या उद्दिष्टासाठी कर्ज घेण्यात आले आहे त्यासाठीच करण्यात यावा.

४.२) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आवश्यक तेवढ्याच कर्जाची उचल करावी.

४.३) सदरचे कर्ज (मुद्दल व व्याज) फेडण्याची संपूर्ण जबाबदारी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची राहील.

४.४) सदर शासन हमीवर देण्यात आलेल्या कर्जाचे दायित्व शासनावर येणार नाही, याबाबत नगर विकास विभागाने दक्षता घ्यावी.

४.५) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दर महिन्याला कर्ज परतफेडीच्या प्रगतीबाबतची स्थिती दर्शविणारी माहिती नगर विकास विभागाकडे / वित्त विभागाकडे सादर करावी.

४.६) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विहित कार्यपध्दतीने लेखा परिक्षित केलेल्या लेख्यांची एक प्रत शासनास सादर करावी.

४.७) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांच्या आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये दर सहा महिन्यांनी (३१मार्च/३० सप्टेंबर) नगर विकास विभागास सादर करावा.

५. **हमी शुल्क**

अ) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घेतलेल्या कर्जावरील प्र.श.प्र.व. हमीशुल्काचा दर रु.०.५०/- असा राहील.

ब) हमी शुल्काचा भरणा दर सहा महिन्यानी करण्यास नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे जबाबदार असतील. प्रत्येक वित्तीय वर्षाच्या ३१ मार्च आणि अथवा ३० सप्टेंबर रोजी अदत्त असलेल्या घटना सापेक्ष दायित्वावर (Contingent Liability) देय असलेल्या हमी शुल्काचा भरणा अनुक्रमे १ एप्रिल आणि / अथवा १ ऑक्टोबर रोजी करण्यात यावा.

क) हमी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यामधून प्रथम थकीत हमी शुल्कावरील दंडनीय व्याजाची रक्कम वळती करुन घेण्यात येईल. नंतर सर्वात जुन्या थकीत हमी शुल्काची वसुली, त्यानंतर त्यापेक्षा कमी जुन्या हमी शुल्काची वसुली याप्रमाणे रक्कम वळती करुन घेण्यात येईल.

ड) देय हमी शुल्क शासन तिजोरीत भरणा करण्यास नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कसूर झाल्यास अशा कसूर केलेल्या थकीत रक्कमेवर पहिल्या तीन महिन्यासाठी १६ टक्के दराने व त्या पुढील कालावधीसाठी २४ टक्के दराने व्याज आकारले जाईल.

इ) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासन हमी शुल्काची रक्कम "००७५-संकीर्ण, सर्वसाधारण सेवा-१०८-हमी शुल्क" या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करावी. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी बँकेस देय असलेली हमी शुल्काची रक्कम शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा केली जाते याची खात्री करुन घ्यावी.

ई) हमी शुल्क भरल्याच्या पृष्ठयर्थ चलनाची साक्षांकित प्रत नगर विकास विभागाने वित्त विभागास पाठवावी.

उ) शासन हमीवरील घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत संनियंत्रणाची जबाबदारी सह सचिव /उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांची राहील.

६. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला कर्ज घेण्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्थांसोबत करण्यात येणाऱ्या करारपत्रांवर स्वाक्षरी करण्याकरिता नगर विकास विभागातील संबंधीत सह सचिव / उप सचिव व वित्त विभागातील उप सचिव (अर्थबळ) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय मा. मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीने दि.११.०३.२०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, नगर विकास विभागाच्या नस्ती क्र. एमआरडी-३३२५/प्र.क्र.४९/नवि-३५ वरील प्रस्तावाच्या व वित्त विभागाचा शासन हमी क्र.१/२०२६-२७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०४२०१२१६११४८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA JITENDRA TARADE

Digitally signed by POOJA JITENDRA TARADE
DN: CN = POOJA JITENDRA TARADE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FINANCE DEPARTMENT
Date: 2026.04.20 12:18:17 +05'30'

**( पूजा तरडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव
३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८) सर्व सन्माननीय सदस्य विधानपरिषद/ विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
९) मा.उप मुख्यमंत्री,राज्य उत्पादन शुल्क,क्रीडा व युवक कल्याण,अल्पसंख्याक विकास व औकाफ यांचे सचिव,
१०) मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व सार्व.बांधकाम-सार्व. उपक्रम) महोदयांचे यांचे अपर मुख्य सचिव,
११) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१३) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानभवन सचिवालय, मुंबई, (५प्रती)
१५) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई-४०० ०२०.
१६) इंडियन नॅशनल कॉग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
१७) नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन. हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई.
१८) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
१९) बहुजन समाज पार्टी,म.रा.,बी.एस.पी. भवन, प्लॉट नं.८३-ए,कलेक्टर कॉलनी चेंबूर, मुंबई-४०००१४.
२०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई-०४.
२१) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी महाराष्ट्र कमिटी,जनशक्ती हॉल,ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई-२८.
२२) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर शिवाजी पार्क, दादर, मुंबई-२८.
२३) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२४) ) वित्त विभाग (ऋण व हमी नियंत्रण कक्ष), मंत्रालय, मुंबई.
२५) कार्यासन अधिकारी-नवि-३५, नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई--४०० ०३२.
२६) संबंधित वित्तीय संस्था (विभागामार्फत).
२७) निवड नस्ती -अर्थबळ.

# ANNEXURE A

**Proforma in which the information in respect of repayment of loan and financial liability of the borrower is to be submitted by the lending institute to the Government every six month (1st April/ 1st Oct)**

1 **Name of Lending Institute:**

2 **Principal Debtor:**

3 **Name of Administrative Dept:**

4 **Guarantee No:**

5 **Date of Validity of Guarantee:**

6 **Report for the period from:** To

**Guarantee & Repayment during the period** (Rupees)

| | | Principal | Interest | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Outstanding guarantee at beginning of the period | | | |
| 2 | Additional guarantee sanctioned, if any during the period | | | |
| 3 | Toal Outstanding ( 1+ 2 ) | | | |
| 4 | Repayment of loan | | | |
| 5 | Balance at end of the period ( 3 - 4 ) | | | |
| 6 | Amount Credited in to Escrow A/C | | | |
| 7 | Net Balance ( 5 - 6 ) | | | |

7 **Payment of Guarantee fees** (Rupees)

| | Outstanding Amount | G . F. | Penal Fee | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Outstanding at the Beginning | | | |
| 2 | G. F. Paid (Rs.) | | | |
| 3 | Date | | | |
| 4 | Challan No. | | | |
| 5 | Balance at end of the period ( 1 - 2 ) | | | |

8 **Types of assets taken as security against amount of loan / outstanding**

| Description Secured | Estimated Value | How |
|---|---|---|
| (I) | | |
| (ii) | | |
| (iii) | | |
| Total | | |

( P.T.O.)

| | |
|---|---|
| 9 Types of inspection of assets / due diligency by lending institute during last 6 months to ensure loans are properly secured. | |
| 10 Financial Health of Principal Debtor<br>(I) Total Turnover of the Principal Debtor<br>(II) Total Profits<br>(iii) % of profits as % of loan amount | |
| **11.** Is in the opinion of lending institute,the borrowing institute in a position to service the debt against which government guarantee is given | |
| **12.** Is in view of the lending institute, the borrowing institute being managed efficiently | |
| **13.** If not, type of corrective action proposed to be taken by lending institute | |
| **14.** Has the lending institute ensured that no further loans have been taken by the borrowing institute since the government guarantee was given | |
| **15.** Has the lending institute ensured that the guarantee fees has been paid to the Goveernment in order to keep the guareante alive and valid | |